मूल्य ३० रुपये • पृष्ठे १०४ • डिसेंबर २०१८ • वर्ष ११ वे • अंक १२

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## मा.शरद पवार

यांना महात्मा फुले समता परिषदेचा

## 'समता' पुरस्कार



## कृषी क्षेत्रात जैन इरिगेशन कंपनीचे काम क्रांतिकारक

# युरोपप्रमाणे ऊस थांबवून बिटाच्या शेतीबाबत विचार सुरु

### शरद पवार यांची सूचना



**कोल्हापूर जिल्ह्याच्या रुकडी येथील कृषीविकास संशोधन केंद्रावर रयत शिक्षण संस्थेने जैन इरिगेशनच्या मदतीने १०० एकर क्षेत्रावर शेतीत सर्वांना मार्गदर्शन ठरेल असा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरलेला पथदर्शी प्रकल्प उभा केला आहे. त्याचे उद्‌घाटन श्री. शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी त्यांनी केलेले हे भाषण.**



अनेक ठिकाणी रयत शिक्षण संस्थेच्या शाखा आहेत. लाखो विद्यार्थी तेथे शिकतायेत. एक वेगळ्या पद्धतीच्या शिक्षणाची सुरुवात संस्थेने केली आणि सामान्य लोकांच्या पाठिंब्यावरच आपण हे काम पूर्णही करतोय. शिक्षणामध्ये बदल झाले पाहिजेत, गरजा लक्षात घेऊन हे बदल ध्यानात ठेवले पाहिजेत आणि या बदलाची जाण नव्या पिढीत तयार केली पाहिजे, हे सूत्र आज रयत शिक्षण संस्थेने घेतले आहे.

शेतीपाठोपाठ पाणी हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. पाण्याच्या काही अडचणी आहेत. पण, पाणी आणायचे कोठून? आणि ते पाणी काटकसरीने शेतीसाठी वापरायचे कसे, हाच प्रश्न आमच्यासमोर होता. त्यावर आम्ही चर्चा केली आणि त्या चर्चेमध्ये पहिल्यांदा आमच्यापुढे जर कोणाचे नाव आले असेल तर, ते भवरलाल जैन यांचे! ते आज हयात नाहीत आणि मला खात्री आहे, येत्या ३-४ वर्षांत ही कंपनी जगातली एक नंबरची कंपनी झाल्याखेरीज राहणार नाही. त्यांनी ठिबक पद्धती येथे सुरू केली. ज्याचा उल्लेख अनिलभाऊंनी केला. भवरलाल जैन व मी अमेरिकेला गेलो. कॅलिफोर्निया या राज्यात जाऊन आम्ही दोघांनी ठिबक पद्धतीचा बारकाईने अभ्यास केला. भवरलाल जैन यांना दृष्टी होती, कर्तृत्व होते. येथे परतल्यावर हे काम त्यांनी हातात घेतले आणि आज जगातली दोन नंबरची कंपनी म्हणून त्यांचा नावलौकीक झालेला आहे. आज अक्षरश: अनवाणी लाखो शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले. हे परिवर्तन करण्याचे काम जैन इरिगेशनच्या माध्यमातून झाले आणि हे करीत असताना याच्या पाठिमागे सातत्याने सामाजिक आशय ठेवला पाहिजे ही भवरलाल जैन यांची इच्छा होती. भवरलाल जैन यांचे सूत्र तंतोतंत अंमलात आणण्यासाठी पुढच्या पिढीने पावले टाकली आहेत, याचा मला आनंद आहे. त्याचे एकच उदाहरण द्यायचे झाले तर, हा जो रुकडीचा प्रकल्प आहे, त्यासाठी जो खर्च आला, त्यापैकी जवळपास ७५ लाख रुपये जैन इरिगेशनने दिलेले आहेत.

जैन इरिगेशनचे वैशिष्ट्य असे की, शेतीमध्ये नवीन तंत्र आणायचे हा त्यांचा दृष्टिकोन असतो. आता हे कृषीतंत्र! यामुळे पिकांवरील रोगराई कमी कशी होईल, वाण कसे चांगले होतील व नुकसानही कमी कसे होईल, या प्रकारचा अभ्यास केला जातो आणि त्यावर उपयुक्त असे बेणं तयार केले जाते. आज ते काम जैन उद्योग करीत आहे. एका बाजूला पाण्याचा संचय कसा करायचा? आणि दुसऱ्या बाजूने शेतकऱ्यांसाठी चांगले पिक घेण्यासाठी चांगले बेणं कसं तयार करायचे, मग ते केळी असो वा डाळिंबाचे असो वा अन्य कशाचे असो. या क्षेत्रात जैन उद्योगाने खरोखर क्रांतिकारक असे काम केले आहे. आणि याही पुढे जाऊन त्या मालावर प्रक्रिया करून आणखी काही पदार्थ करता येईल का व त्याद्वारे शेतकऱ्यांच्या घरातील उत्पन्न वाढण्यास त्यामुळे मदत होऊ शकेल का, याचाही विचार त्यांनी या माध्यमातून केला आहे.




अनेक वेळा मी पाहिले. आज या ठिकाणी एन. डी. पाटील येऊ शकले नाहीत. पण, एन. डी. पाटील व त्यांचे कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बेण्याच्यासंदर्भातील सरकारचे धोरण कसे बदलता येईल व शेतकऱ्यांना चांगले बेणे कसे देता येईल, या बद्दलचा आग्रह त्यांचा सातत्याने होता. आणि सरकारलासुद्धा त्याप्रमाणे बदलावे लागले. आता त्याच्यापुढे जायची गरज आहे. विजेचा वापर कमी कसा करता येईल, त्याहीपेक्षा विजेची अधिक निर्मिती कशी करता येईल व विजेच्या अधिक निर्मितीला प्रोत्साहन कसे देता येईल, या पद्धतीने आपण विचार करण्याची गरज आहे आणि सौरऊर्जा हाच एक पर्याय आहे. सोलर, म्हणजे सौरऊर्जा आज देशात वाढायला लागली आहे. अनेक गोष्टी सौरऊर्जेवर होत अहेत. या गोष्टींना प्रोत्साहन द्यावे लागते. मी अनेक वर्षांपासून या सगळ्या क्षेत्रात लक्ष घालतो. आपल्या राज्यात येथून जवळच एक डोंगर आहे. त्या वेळी विक्रमसिंह पाटणकर हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. त्यांना मी म्हटले, आपल्याला तिथे जायचे आहे. तेव्हा ते म्हणाले, ते जमणार नाही. खूप चालावे लागेल. नंतर कधीतरी जाऊ. मी त्यांना सांगितले, माझ्याकडे हेलिकॉप्टर आहे. मी पायलटला बोलावून घेतले. मी त्याला सांगितले, आपल्याला ८ वाजता त्या डोंगरावर जायचे आहे. तेव्हा तू ७ वाजता तेथे जाऊन हेलिकॉप्टर उतरणे शक्य आहे का व मला खालून नेता येईल का याची पाहणी करून ये. तो पाहणी करून आला व तेथे जाता येईल, असे मला सांगितले. आम्ही हेलिकॉप्टरने त्या डोंगरावर उतरलो आणि तिथे वारा इतका होता की, हेलिकॉप्टर हलायला लागले. माझ्या मनात आले की, इतका जर वारा असेल तर, या वाऱ्याचा उपयोग करून घेता येईल का? तेव्हा मी मुख्यमंत्री होतो. मी मुंबईला परत गेलो. अधिकाऱ्यांना घेऊन पंजाबला गेलो. मी त्यांना म्हणालो, कोयनेच्या परिसरातील डोंगरांचा अभ्यास करा. तज्ज्ञांचा सल्ला घ्या व या डोंगरावरील वाऱ्यापासून आपल्याला वीज तयार करता येईल का, यावर विचार करा. त्यांनी अभ्यास केला व वीज तयार करता येईल असे सांगितले. आम्ही धोरण आखले व आज काही हजार किलोमीटर भागात वाऱ्यापासून वीज तयार केली जात आहे. आज त्या भागात स्वस्तामध्ये वीज तयार होऊ लागली आहे. साधारणत: पाऊस कमी असला तर, मी मंत्रिमंडळात चौकशी करायचो, आपल्या भागात पाऊस कसा आहे? आणि नंतर, त्या त्या भागात फोन करून विचारायचो की, पाऊस झाला की नाही? वाफसा आला की नाही, पेरण्यांची तयारी झाली का? विक्रमसिंह असे काही विचारायचे नाहीत. ते फोन करायचे व वारा कसा आहे, असे विचारायचा. वारा चांगला असेल तर, वीज निर्मिती होते व वीज असेल तर, पाणी उपसा होतो व बाकी सगळे ठीक होत, असे त्यांचे गणित होते.

आज जगात देश जे पुढे गेले आहेत, ते सौरऊर्जेच्या माध्यमातून! ते सौरऊर्जेचे पॅनेल तयार करतात. जमिनीवर टाकतात. सूर्यकिरण त्यावर पडल्यावर त्यापासून वीज तयार करण्याचे काम केले जाते. आज जगात ठिकठिकाणी अशा प्रकारची वीज निर्मिती व्हायला लागली आणि मला आनंद आहे, की जैन इरिगेशनने त्याचे महत्त्व ओळखले व सौरऊर्जा पंखे, सौरऊर्जा पंप उत्पादित करण्याचे काम हे त्यांनी केलेले आहे. त्याबद्दल मी अनिलभाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांना धन्यवाद देतो. त्यांनी आणखी एक चांगली गोष्ट केली, सोलर(सौरऊर्जा) चे पिलर उभे करायचे व त्यावर सोलर पॅनल बसवायचे. खाली शेती, वर सोलर, त्या सोलरद्वारे सूर्यप्रकाशातून वीज आणि ती




वीज राज्य वीज मंडळाला देऊन विजेचे बिल ५० टक्के कमी करायचे, हे सूत्र आज त्यांनी हाती घेतले आहे व त्याचा शंभर टक्के वापर करण्याचे त्यांनी ठरवलेले आहे, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

हा प्रकल्प केवळ चांगलाच आहे असे नसून त्यामुळे शेतकऱ्यांना मार्गदर्शन होईल. जैन परिवाराची मदत ही संस्थेच्यादृष्टीने अत्यंत मोलाची आहे. जर तुम्ही कधी जळगावला गेलात तर, जैन हिल्सवर एक गांधींचे कायमस्वरूपी स्मारक, त्यांच्या विचारांचे जैन परिवाराने केले आहे, ते आपल्याला पाहावयास मिळेल. आज नेमका तोच विचार कर्मवीरांच्या अंत:करणात होता आणि कर्मवीरांनी आयुष्यभर गांधीजींचा विचार नजरेसमोर ठेवून, त्यावर आधारित नवी पिढी कशी तयार करता येईल, हे त्यांनी कायम मनात ठेवले होते आणि त्याचा लाभ आज भारतामध्ये नव्या पिढीला मोठ्या प्रमाणात मिळतोय. हा प्रकल्प रुकडीमध्ये सुरू झाला, याचा मला आनंद आहे. शाहूराजांचा आदर्श या ठिकाणी होता. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे केंद्र या ठिकाणी आहे. या सगळ्यांच्या मदतीने आपण हे केंद्र उत्तमरीतीने चालवू शकू असा विश्वास वाटतो.


आज सकाळी धनंजय महाडिक मला सांगत होते, कोल्हापूर जिल्ह्यात कृषी विकास केंद्र काढण्याची अत्यंत गरज आहे. तेव्हा त्यांना इथे आल्यावर कळले की, या कामाची सुरुवात रुकडीकरांनी यापूर्वीच रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरू केली आहे. हे संशोधन केंद्र जसे विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी उभे करण्यात आले आहे तसेच, शेतकऱ्यांसाठीसुद्धा आहे. त्यांच्यासाठी पिके घेण्याचा विचार माझ्या मनात आला आहे. आपण सर्वसाधारणपणे उसाचे पिक घेतो. मी विचार करीत होतो, याला काही पर्याय देता येईल का? आज आमच्यावर टीका होते, की महाराष्ट्रातला ऊस उत्पादक शेतकरी हा सर्वांत जास्त पाणी घेतो. थोडे पाणी घेत असलो तरी, पाणी घेतो ही गोष्ट खरी आहे. मात्र, राज्य सरकारच्या आर्थिक उत्पादनात आम्ही वाटा देतो. जगात एके काळी भारताचा साखर आयात करणारा देश म्हणून लौकीक झाला. पाणी घेतो म्हणून आमच्यावर टीका होते पण, मी त्याच्यावर काही उपाय करता येईल का याचा विचार करीत होतो. उसाच्या नव्या जाती आल्या. असे काही बघायला मी सातत्याने जगात हिंडत असतो. या उसाच्या जाती येथे कशा तयार होतील, याची काळजी घेतली. ८६०३२ आणि बाकी सगळ्या जाती, याचा विस्तार करण्यात आला. त्यामुळे उत्पादन वाढले. पण, आणखी काही जाती तयार केल्या पाहिजेत आणि त्या जाती करायच्या असतील तर, त्याला एक वेगळी जमीन लागते. आपल्याला आठवत असेल, ४०-५० वर्षांपूर्वी ज्या भागात ऊस असायचा त्या उसाला पांढरे तुरे असायचे. आता दिसत नाहीत. त्या तुऱ्याचा उपयोग बाकी काही नसला तरी त्यातून उसाचे बी बाहेर काढता येत होते. त्या बियांपासून नवीन जात करता यायची. आता ते कोठे आढळत नाही. त्याला विशिष्ट हवा व अतिवृष्टी लागते. पुणे जिल्ह्यात मुळशी, म्हाळुंगी अशी काही ठिकाणे आहेत. महाबळेश्वरजवळ एक ठिकाण आहे व इथे कोल्हापूरजवळ आंबोली घाटाच्यावर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने एक जागा घेतली आहे, तिथे आम्ही या नवीन जाती तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत. उसाचा कालावधी कमी कसा करता येईल व उसाचा उतारा कसा वाढवता येईल आणि पाणी कसे कमी लागेल यादृष्टीने आमचा प्रयत्न आहे. तसे संशोधन चालू आहे.

हे सगळे खरे असले तरी, युरोप खंड दुसऱ्या दिशेने चालला आहे. युरोप खंडात त्यांनी ऊस थांबवला. पण, साखर तयार करतात. ते बिटापासून साखर तयार करतात. आपल्याकडे रताळ असतात, त्याप्रमाणे ते बिट असते व त्यापासून साखर करतात. एक महिन्यापूर्वी मी त्या ठिकाणी जायचे ठरवले व पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील काही शेतकरी घेतले व युरोपला ते पाहण्यासाठी गेलो. फ्रान्सला गेलो, नेदरलँडला गेलो. तिथली सगळी बिटची शेती पाहिली. बिटाला हवा कशी लागते, पाणी किती लागते, या सगळ्याचा अभ्यास केला. बिट संशोधन केंद्रात दोन दिवस घालवले व बिटापासून जेथे साखर तयार करतात, त्या कारखान्यात दोन दिवस घालवले. त्याचा सखोल अभ्यास केला व असा विचार केला की, हे पिक महाराष्ट्रात घेणे शक्य आहे. निर्णय घेतला नाही.

यापूर्वी आम्ही तसा प्रयोग केला. पण, अपयश आले. आता या देशात आम्ही नवीन जाती आणल्या व उसाच्याऐवजी बिट लावता येईल का, असा प्रयत्न आम्ही म्हणजे, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट करणार आहे. बिटाचा सगळ्यात मोठा फायदा म्हणजे, बीट हे सहा महिन्यांचे पिक आहे. परिणामी, वर्षात दोन पिके घेणे शक्य आहे. उसाचे पिक १२ महिन्यांचे असले तरी ते काही वेळा १४ महिने १८ महिन्यांपर्यंतही जाते. ऊसवाले जास्त पाणी घेतात, ही टीका टाळायची असेल तर, उसाचे रूपांतर दुसऱ्या पिकात करता येईल का याचा विचार आपण केला पाहिजे. म्हणून आम्ही बीटचा विचार करतोय. हा प्रयोग यशस्वी झाला तर वर्षातून दोन पिके घेता येतील. शेतकऱ्याला दोन पैसे जास्त देता येतील. एक चांगले काम आपण या ठिकाणी सुरू केले आणि ती वेगळ्या पद्धतीने कशी पुढे न्यायची, ऊसशेती कमी कशी करायची, उसाला पर्याय असेल तर तो कसा शोधायचा आणि शेतकऱ्याचे घर हे समृद्धीच्या मार्गाने कसे जाईल, नवी पिढी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे या सगळ्या क्षेत्रात कशी यशस्वी होईल, या संदर्भात आपण पावले टाकायची. एका बाजूला तुम्हाला जैन इरिगेशनची मदत आहे. दुसऱ्या बाजूला रयत शिक्षण संस्थेच्या सगळ्या पदाधिकाऱ्यांची साथ आहे, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांची साथ आहे, त्यामुळे तुम्हाला यात यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करतो.

---

जैन इरिगेशनने रुकडी येथे सिंचनासाठी जगातील अत्याधुनिक असे ऑटोमेशनचे जे वेबबेस तंत्रज्ञान बसविले आहे, त्याची पाहणी करताना शरद पवार, डॉ. अनिल पाटील, अनिल जैन. डॉ. भाऊसाहेब कराळे, सौ. सरोज नारायण पाटील.



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

# जैन इरिगेशनच्या १२ हजार सहकाऱ्यांची शेती व शेतकऱ्यांशी बांधिलकी

**अनिल जैन**



आजचा हा कार्यक्रम म्हणजे, एक चांगली उपरती आहे आणि त्याच्या मागे पवार साहेब, त्यांचे मार्गदर्शन, त्यांच्या सूचना, त्यांचा आदर्श आहे. पाटीलसाहेब मला म्हणाले, हे होऊ शकेल का. त्यावर हे झालेच पाहिजे, असे त्यांना मी सांगितले. कारण, कृषी विकासाशिवाय आणि कृषीमध्ये जास्त संशोधन केल्याशिवाय आपण जास्त पुढे जाऊ शकत नाही.

मित्रांनो, जैन इरिगेशनचे नाव आज ठिबक सिंचनासाठी जगभरामध्ये नावाजलेले आहे. महाराष्ट्रात ठिबक सिंचन कसे आले, याच्या मागची गोष्ट तुम्हाला सांगतो. आत्ता प्रास्ताविकात सांगण्यात आले की, पवार साहेब, विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा या सर्व ठिकाणी राहिले. व त्यांनी खूप सहकार्य केले. जबाबदारी घेतली. याचे चांगले उदाहरण म्हणजे, ठिबक सिंचन! १९८६ मध्ये आमच्या भाऊंनी ठिबक सिंचनात छोटी कंपनी, छोटे काम सुरू केले होते. पण, ठिबक सिंचनाला एका एकराला ४३ हजार रुपये लागतात व शेतकऱ्यांकडे तेवढे पैसे नसतात. त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले व कॅलिफोर्नियात ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान शेतीमध्ये कसे लागते, त्याचा फायदा किती होतो, याचा अभ्यास करण्यास सांगितले. साहेब, त्या वेळी सत्तेतही नव्हते. विरोधी पक्षात होते. तेव्हा त्यांनी तीन दिवस देऊन त्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्याच्यानंतर हे जेव्हा सत्तेत आले, तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांसाठी भारतात प्रथमच ठिबक सिंचनासाठी अनुदान योजना (सबसिडी) सुरू केली. जेव्हा शेतकऱ्यांना एकरी ५०० रुपये किंवा २ हजार रुपये एकर एवढीच कमाई होती, तेच शेतकरी आता ५० हजार रुपये एकर ते ५ लाख रुपये एकर इतके उत्पन्न घेऊ लागले आहेत आणि त्यांचे उत्पन्न वाढलेले आहे. याच्यामागे एक सततचे मार्गदर्शन, नवीन तंत्रज्ञान कोठून आणावे, कसे आणावे व त्याची शेतकऱ्यांसाठी कशी अंमलबजावणी करावी, हे नेहमीच राहिलेले आहे.



कृषी विकास संशोधन केंद्राच्या कोनशिलेचे शरद पवार अनावरण करताना, शेजारी अनिल जैन, कल्लाप्पा आवाडे, हसन मुश्रीफ, भगीरथकाका शिंदे, धनंजय महाडीक, डॉ. भाऊसाहेब कराळे व अन्य मान्यवर.




जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन व विपणन विभागाचे संचालक अभय जैन यांचा शरद पवार सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना. शेजारी हसन मुश्रीफ, डॉ. अनिल पाटील, सरोज पाटील, वैभव नायकवडी आणि कल्लाप्पा आवाडे.

आज योगायोग पाहा, ठिबक सिंचनाचे चीज होणे म्हणजे काय हे दिसून येते. साहेबांनी १९८७ साली मदत करून हे महाराष्ट्रापुढे ठेवले, आज आपण रुकडीला बघतोय, शंभर एकर मध्ये ठिबक सिंचनाची मदत घेऊन आपण येथे कृषी संशोधन केंद्र सुरू करणार आहोत. त्यांनी आम्हाला या निमित्ताने एक संधी दिली आहे, आमच्यावर एक जबाबदारी टाकली आहे. आणि त्याच जबाबदारीने आम्ही हे यशस्वी करून दाखवू. हा विषय केवळ इथल्या शंभर एकराचा नाही. तर, या संपूर्ण विभागासाठी हे पथदर्शी फार्म म्हणून उभे राहील व हजारो, लाखो शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.

आता आपण शेतकऱ्यांना पाईपही देतो. पण, ज्या शेतकऱ्यांना वीज मिळत नाही. शेतात पाणी भरपूर असूनही विजेची समस्या असल्याने शेती नीट करता येत नाही, अशा शेतकऱ्यांसाठी आपण सौरऊर्जेच्या पंपाचीही सोय केलेली आहे. आज जगातील सौरऊर्जा पंपाची सर्वांत मोठी कंपनी आपली झालेली आहे. त्यामुळे सर्वांगिण शेतीमध्ये ऊर्जेचा विषय असो, पाण्याचा विषय असो, प्लँटिंग मटेरियल, या सर्वांचे एकत्रिकरण करून आपली कंपनी काम करीत आहे. मला सांगावे वाटते की, भारतात आपण ७० लाख शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलो आहोत. पण, देशात १२ कोटी शेतकरी आहेत, त्यामुळे आमच्यासाठी अजून भरपूर काम आहे. संपूर्ण आयुष्य जरी आम्ही यासाठी खर्च केले तरी कमी पडणार आहे. आपल्या जैन फॅमिलीची व जैन इरिगेशनमध्ये असलेल्या १२ हजार सहकाऱ्यांची बांधिलकी आहे की, शेती व शेतकऱ्यांसाठी आम्ही काम करीत राहू. जी शेतकऱ्यांची मुले आहेत, त्यांना आम्ही आधुनिक शेती कशी करावी, वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन शिकवतो. रयत शिक्षण संस्थेच्या ३० शाळांमध्ये आम्ही हा कार्यक्रम राबविला आहे. महाराष्ट्रातल्या विविध भागात जाऊन आम्ही हा उपक्रम राबवतो. मग हे जे विद्यार्थी असतात, ते नवीन पद्धतीने शेती कशी करतील, याच्यावर आमचे लक्ष असते.



अनिल जैन यांचा शाल घालून शरद पवार सत्कार करताना.

माझ्या वडिलांची अशी इच्छा होती, पुढची जी नवीन पिढी येणार आहे, त्यांना गांधीजी हे कोण होते, हे कळावे, म्हणून....१९४७ किंवा त्यापूर्वी गांधीजींची जितकी आवश्यकता होती, तितकीच आजही गांधीजींच्या विचारांची समाजाला गरज आहे, असे वडिलांना वाटायचे. म्हणून, आम्ही गांधी विचार संस्कार परीक्षा वेगवेगळ्या शाळांमध्ये घेत आहे. आपल्या रयतमधील दहा हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी त्या परीक्षा देत आहेत. त्याच्याबद्दल डॉ. अनिल पाटील व रयत शिक्षण संस्थेचा मी आभारी आहे.

कुंभोज येथे कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नी यांचा पूर्णाकृती पुतळा आणि नव्याने शैक्षणिक संकुल उभे करण्यात आले असून त्याचे उद्‌घाटन शरद पवार यांच्या शुभहस्ते झाले. त्याप्रसंगी त्यांनी केलेले हे भाषण.



# शिक्षणाच्या विस्तारासह गुणवत्तेचाही अण्णांचा आग्रह होता

## शरद पवार यांचे विचार

या देशाच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्या काही व्यक्तींनी व संस्थांनी उत्तम काम केले आणि पुढची पिढी घडविण्यासाठी हातभार लावला, त्याच्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचा उल्लेख करावा लागेल. त्यामुळे शिक्षण संस्थेचे जन्मदाते, त्यांचे जन्मगाव हे कुंभोज म्हणून त्या 'रयत'च्या संबंधीत सर्व घटकांना एक प्रकारचे पवित्र स्थळ वाटते आणि आज त्या पवित्र स्थळावर कर्मवीर भाऊराव पाटील शैक्षणिक संकुल आणि अण्णा व वहिनींचा पूर्णाकृती पुतळा उभारला जात आहे. या वास्तूचे उद्‌घाटन व अनावरण तुमच्या साक्षीने झाले असे मी जाहीर करतो.

आज खऱ्या अर्थाने गरज आहे ती शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची, शिक्षणाच्या विस्ताराची पण, त्याचबरोबर शिक्षणाच्या गुणवत्तेची आहे. त्याचा दर्जा सुधारला पाहिजे. गेल्या काही दिवसांमध्ये मी शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या विशेषत: राज्यातल्या काही भागातल्या लोकांना निमंत्रित केले आणि त्यांच्याशी सुसंवाद साधत होतो. तेव्हा काही ठिकाणी मला असे जाणवले की, आपल्या राज्याच्या काही भागाची शैक्षणिकदृष्ट्याा गुणात्मक अधोगती होती की काय असे वाटत होते. विद्यार्थ्यांची उपस्थिती नाही, शिक्षकांची उपस्थिती नाही, परीक्षा म्हटल्यानंतर, त्या ठिकाणी कॉपी करण्याचे प्रकार वाढलेले आहेत. एवढेच नव्हे तर, त्या गावात न राहणारे, ५००-५०० मैल दूर असणारे विद्यार्थी अशा ठिकाणी नाव नोंदवितात व या सगळ्या शैक्षणिक चौकटीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. ही स्थिती महाराष्ट्राच्यादृष्टीने काही चांगली नाही. त्यामुळे शिक्षणाचा जसा विस्तार झाला पाहिजे, तशी गुणवत्ताही वाढली पाहिजे आणि कर्मवीरांनी जे काम हातात घेतले, ते विस्ताराच्या संदर्भातले होते, विस्ताराबरोबर गुणवत्तेचाही त्यांचा आग्रह होता. त्या गुणवत्तेची संधी नव्या पिढीला मिळावी म्हणून, ज्यांना दरवाजे खुले नव्हते, अशांना एकत्रित करून त्यांना शिक्षित करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले होते. कदाचित, रयत शिक्षण संस्था देशातील अशी एकमेव संस्था असेल, की ज्या संस्थेने लोकप्रतिनिधी दिले, कुलगुरू दिले, उत्तम अध्यापक दिले, वेगवेगळ्या क्षेत्रातले प्रशासक दिले, वेगवेगळ्या क्षेत्रातील बँकांत कन्सल्टंट दिले, शेतीच्या क्षेत्रातील बँकांतसुद्धा तज्ज्ञ देण्याची खबरदारी घेतली. त्याचे मुख्य कारण, अण्णांचा त्याच्याबद्दलचा दृष्टिकोन हा विस्ताराबरोबर गुणवत्तेच्या संदर्भातला होता. आज कुंभोजला आल्यानंतर त्याचा अधिक उत्कर्ष कसा करता येईल, याचा विचार करून आज या ठिकाणी शैक्षणिक संकुल उभे केले आहे. डॉ. अनिलकाकांनी सांगितले, या संस्थेत काम करणाऱ्या जवळपास सगळ्या लोकांना या संकुलमध्ये यावे लागेल आणि नंतर आपल्या कामाची सुरुवात करावी लागेल.

काही वर्षांपूर्वी मी दक्षिण कोरियात गेलो होतो. दक्षिण कोरिया हा देश महाराष्ट्राच्या निम्मा आहे. पण, विविध क्षेत्रांमध्ये

प्रचंड प्रगती केली आहे. त्या दक्षिण कोरियात माझे टॉम के यंग या नावाचे एक मित्र होते, आता ते हयात नाहीत. त्यांनी मला त्यांच्या देशातले सगळे फार्म दाखविले. त्यांची व माझी एकदा कधीतरी जागतिक बँकेत भेट झाली होती. नंतर त्या भेटीचे रूपांतर मैत्रीत झाले. या टॉम केम यंग यांनी आपल्या करियरची सुरुवात एक मोटार मेकॅनिक म्हणून केली. नंतर ते मोटारची चॅसी बांधायला लागले. चॅसी बांधत असताना इंजिन तयार करायला सुरुवात केली. नंतर ते चारचाकी गाड्या तयार करायला लागले. त्याने मला सांगितले, एक दिवस माझी गाडी तुझ्या देशात दिसली पाहिजे व अमेरिकेतही दिसली पाहिजे. आज मला ती गाडी दिसतेय. 'हुंदाई' या कंपनीचा मालक तो होता. 'हुंदाई'ही आता जगप्रसिद्ध कंपनी आहे. गाड्या बनवतात, बोटी बनवतात, बांधकाम क्षेत्रातही ही कंपनी उतरली आहे. अनेक क्षेत्रात ते यशस्वी



झाले आहेत. एके दिवशी मी टॉमला विचारले, हे यश तुम्ही कसे संपादन केले. त्यांनी सांगितले की, माझ्या देशात आम्ही सगळ्यांनी मिळून सरकारला एक कायदा करायला सांगितला आणि तो कायदा असा, सरकारच्या वतीने कोणत्याही क्षेत्रात काम करणारा माणूस असेल तर, त्याला तीन महिन्यांचे प्रशिक्षण एका संस्थेतून घ्यावे लागते, ते प्रशिक्षण घेतल्याखेरीज त्याला निवडणुकीचा फॉर्मदेखील भरता येत नाही. आज या ठिकाणी हे संकुल उभे राहतेय, त्याच्यातून रयत शिक्षण संस्थेत काम करणाऱ्या सगळ्या घटकांना तशा प्रकारची सुविधा, यशदासारखी द्यायची संकल्पना आहे. माझी सगळ्या सहकाऱ्यांना सूचना आहे, इथूनपुढे 'रयत'मध्ये प्रमोशनचा विचार करताना, या संस्थेत, या संकुलात काही दिवस शिक्षण घेण्याचे काम करून, चांगल्या संस्काराने तयार झालेली व्यक्तीच पात्र ठरेल, असा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. त्या शिवाय ही गुणवत्ता वाढणार नाही. त्यामुळे हे गुणवत्तेचे केंद्र, उत्तम कर्तृत्ववान व्यक्तींचे केंद्र, उत्तम प्रशासन तयार करण्याचे केंद्र म्हणून हे संकुल झाले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. हे केंद्र इथे शिक्षित करण्याचे काम करेल, ते केवळ इथेच करेल असे नाही तर, इंटरनेटच्याद्वारे महाराष्ट्रातल्या कोणत्याही शिक्षण संस्थांना या संबंधीचे ज्ञान हवे असेल तर, ते ज्ञान देण्याची सुविधा इथून 'डिस्टंट एज्युकेशन'च्या माध्यमातून दिली जाईल. हे फक्त रयत शिक्षण संस्थेलाच नव्हे तर, ज्या शिक्षण संस्थांना आपले सहाय्य हवे असेल, त्यांना देण्यासंबंधी आम्ही पावले टाकू,याची खात्री मी या ठिकाणी आपणा सगळ्यांना देऊ इच्छितो.

जे कार्य करण्यासंबंधीची भूमिका अण्णांनी घेतली, ते उभ्या आयुष्यात त्यांनी केले. संस्था वाढली. ध्येयवादी लोकांचा संच त्यांनी तयार केला आणि त्या सगळ्यांनी कशाचीही अपेक्षा न करता काम केले. एक वर्ष संस्थेवर संकट आले. त्या वर्षी सरकारने संस्थेचे अनुदान बंद केले. अशा काळात विनावेतन काम करणारे प्राध्यापक, प्राचार्य मिळाले. त्याचे महत्त्वाचे कारण, अण्णांनी शिक्षणाचे महत्त्व सांगत असताना, त्यागाचे संस्कारही त्यांच्यावर अतिशय उत्तमरीतीने केले, म्हणून हे घडून आले. अशा या संस्थेचे महत्त्वाचे केंद्र कुंभोजला होतेय, जिथे अण्णा व वहिनींचा जन्म झाला. मला खात्री आहे, या जन्मगावातून अण्णांचे विचार,



कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नीच्या पूर्णाकृती पुतळ्याचे शरद पवार यांनी अनावरण केले, तेव्हा शेजारी अनिल जैन, डॉ. अनिल पाटील, सौ. सरोज पाटील, कल्लाप्पा आवाडे, प्रकाश आवाडे, धनंजय महाडीक, ॲड. भगीरथकाका शिंदे, विश्वजित कदम, रामशेठ ठाकूर, राम कांडगे, हसन मुश्रीफ, चंद्रकांत दळवी, आबासाहेब देशमुख व इतर मान्यवर.

त्यांची दृष्टी, त्यांची काम करण्याची पद्धती ही महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचेल. ती नव्या पिढीला एक प्रकारे प्रोत्साहित करेल. ज्यांनी ज्यांनी मदत केली, त्या सर्वांना मनापासून धन्यवाद.

आज आम्ही रुकडी येथे शेतीच्या संदर्भातील एक प्रकल्प सुरू केला आणि जैन इरिगेशनने त्याला फार मदत केली. त्यांनी नवीन तंत्र दिले. त्याच्याबरोबर साधने देण्याची तयारी दाखवली. यापुढे वीज वापरावर कशी मर्यादा आणता येईल व सोलरच्या माध्यमातूनही वीज कशी आणता येईल, याचा विचार केल्यानंतर, त्यालाही सहाय्य करण्याची भूमिका जैन इरिगेशनच्या वतीने घेण्यात आली.

आज भवरलाल जैन हयात नाहीत. पण, त्यांचा आदर्श घेऊन चालणारी पुढची पिढी आज जैन इरिगेशनचे नेतृत्व करतेय आणि 'रयत'च्या पाठिशी अशा कर्तृत्ववान, सामाजिक आशय घेऊन काम करणाऱ्या विविध संस्थांचा व व्यक्तीचा पाठिंबा मिळतोय, हे 'रयत'चे भाग्य म्हणावे लागेल. त्यामुळे कोणत्याही संकटाची चिंता वाटत नाही. त्याचे कारण, अण्णांची पुण्याई व तुम्हा लोकांचा पाठिंबा, यामुळे मोठ्या प्रमाणावर आम्ही काम करू शकतो.

गावच्या लोकांनी आमचे स्वागत केले. सरपंचांनी पत्र दिले. त्यात गावच्या समस्या सोडविण्यासाठी हे गाव दत्तक घ्या., अशी त्यांनी मागणी केली. पण, मी अनिल जैन यांचे आभार मानतो. त्यांनी सुरुवातीलाच सांगितले की, मी दहा गावे दत्तक घेत आहोत, त्याच्यात कुंभोजचे नाव समाविष्ट आहे. इथे सांगण्यात आले, अजित पवार अर्थमंत्री असताना या गावाला ५ कोटी रुपये अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले. त्या पैकी ३ कोटी मिळाले. सरकार बदलले आणि उरलेले दोन कोटी राहिले. या ठिकाणी हसन मुश्रीफ आहेत, विश्वजीत कदम आहेत. दोन्हीही आमदारांना सांगतो, राज्य सरकारकडून राहिलेले दोन कोटी वसूल करण्यास तुम्हाला समाजात जे काही करावे लागेल, त्याला आमची परवानगी आहे. चेष्टेचा भाग सोडा. पण, गुणवत्ता वाढीच्यादृष्टीने जे जे काही करावे लागेल आणि अण्णांच्या नावाने जे काम सुरू करता आहात, त्याला गती देण्यासाठी तुम्हा सगळ्यांची साथ कुंभोजकरांना राहील, हा विश्वास या ठिकाणी व्यक्त करतो.



**शरद पवार हे बटन दाबून कुंभोज येथे कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नीच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करताना, शेजारी अनिल जैन, धनंजय महाडीक, सौ. सरोज पाटील, कल्लाप्पा आवाडे, प्रकाश आवाडे, हसन मुश्रीफ, ॲड. भगीरथकाका शिंदे, चंद्रकांत दळवी व इतर मान्यवर .**



# अधिक उत्पादन क्षमता व गुणवत्तेसाठी जैन इरिगेशन कटिबद्ध

## अनिल जैन यांचे विचार

कुंभोज येथे होणाऱ्या या समारंभास उपस्थित राहण्याची संधी दिल्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो व त्याबद्दल पवार साहेब आणि डॉ. अनिल पाटील यांचे आभार मानतो. मित्र हो!, मी जळगावहून येथे आलेलो आहे. जळगाव-कोल्हापूर हे अंतर जास्त आहे. पण, काही गोष्टीत योगायोग असतात, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटलांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य शिक्षणासाठी वाहून घेतले. अडीच वर्षांपूर्वी देवाज्ञा झालेले माझे वडील भवरलालजी यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य शेतीसाठी दिले. ते कर्मयोगी होते. त्यांचाही जन्म एका खेडेगावात झाला. त्या वेळी त्या गावची लोकसंख्या फक्त एक हजार होती. तेथून जळगावला येऊन त्यांनी शेती हा व्यवसाय करण्याचे निश्चित केले. पण, व्यवसाय असा करावा, ज्याच्यामुळे शेतकऱ्यांची मिळकत नेहमी वाढत जाईल. त्याची समृद्धी वाढत जाईल, हा त्यांनी केंद्रबिंदू ठेवला होता. शेती व शेतकरी एवढेच धरून न बसता त्यांनी त्याच्याबरोबर विज्ञानाची कास धरली. तो माझ्या वडिलांचा मूळ धर्म झाला होता.

इथे आपण एका पवित्र स्थळी आलो आहोत, हाही एक दुसरा योगायोग म्हणावा लागेल. गेल्या दीड-दोन वर्षांमध्ये आम्ही रयत शिक्षण संस्थेबरोबर काम करीत आहोत. आजच रुकडी येथे शंभर एकराचे कृषी विकास संशोधन केंद्र सुरू केले आहे. ज्याच्यामुळे इथल्या आसपासच्या शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती मिळावी, शेतीत जे नवीन प्रयोग होत आहेत, ज्यामुळे संपन्नता वाढू शकते, त्याची त्यांना माहिती मिळावी, या हेतूने हे केंद्र उभारण्यात आलेले आहे. भविष्यात इथूनपुढे आम्ही रयत शिक्षण संस्थेबरोबर काम करीत राहू आणि दुसरे काम रयत शिक्षण संस्थेबरोबर करतोय, ते म्हणजे, आजची जी नवी पिढी, जे आठवी, नववीमध्ये विद्यार्थी आहेत, त्यांना शेती करून शिका किंवा त्यांना नवीन तंत्रज्ञान कसे देता येईल, याच्याबद्दल आम्ही ३० शाळांमधून काम सुरू केले असून ते काम कसे वाढवता येईल, याद्दल आम्ही डॉ. अनिल पाटलांबरोबर चर्चा करतोय आणि मला खात्री आहे, येत्या तीन वर्षांत आम्ही ३० शाळांपासून १०० शाळांपर्यंत जाऊ., जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना तयार करू. पुढच्या १०-२० वर्षांत शेती भाताची लागेल, ज्याच्यामुळे वातावरण बदलाचा प्रश्न आपण सोडवू शकू आणि भारतीय शेती अशी पाहिजे, ज्याच्यामध्ये २ एकर, ४ एकर, ५ एकर शेती असलेला छोटा शेतकरी, त्याला जास्तीची उत्पादन क्षमता व गुणवत्ता टिकवता आली पाहिजे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत व त्यासाठी सातत्याने काम करणार आहोत.

मित्रांनो, रयत शिक्षण संस्थेबरोबर अजून एक काम आम्ही करतोय ते म्हणजे, गांधी रिसर्च फौंडेशनचे काम आमच्या वडिलांनी जळगावला केले आहे, त्याच्यात महात्मा गांधींच्या जीवनावरती आणि आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले आहे,

त्याविषयी जगातले एक भव्य असे संग्रहालय आम्ही जळगावला केले आहे. त्याला गांधी रिसर्च फौंडेशन म्हणतात. त्याच्यातून आम्ही ज्या परीक्षा घेतोय, त्यात रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा सगावीश आहे.. त्यांना आजच्या काळातही गांधींजींचे विचार किती समर्पक आहेत, गांधीजींचे विचार आजच्या समाजाला किती महत्त्वाचे आहेत, हे पटवून देण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत.

साहेब, आपण आणखी एक उपक्रम हाती घेण्याचा विचार करतोय. पुढच्या वर्षी महात्मा गांधींची १५० वी जयंती आहे आणि कस्तुरबा यांचीही १५० जयंती आहे. म्हणून गांधी रिसर्च फौंडेशनतर्फे आपण 'बा-बापू-१५०' म्हणजे, बापूजी व कस्तुरबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपण १५० खेड्यांत आम्ही काम करू इच्छितो त्या मागे असा विचार आहे की, १५० खेड्यांमध्ये आपण सहा गोष्टींवर अधिक लक्ष्य केंद्रीत करणार. त्यात पाणी, शेती, आरोग्य, शिक्षण, व्यसनमुक्ती व स्वच्छता यांचा समावेश करण्यात आला आहे. सातवा विषय हा आहे की, लोकांनी स्वत:ची इंडस्ट्री किंवा व्यवसाय करावा. स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती व्हावी, त्या योगे नव्या पिढीला असे वाटू नये की आपण रोजगारासाठी शहरातच जावे. इथे राहूनही त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. हा त्या मागचा उद्देश आहे व हे काम टप्प्याटप्प्याने होणार आहे. आत्ताच मी डॉ. अनिल पाटील यांच्याबरोबर बोलत होतो, जी १५० खेडी आम्हाला निवडायची आहेत, त्यातील दहा खेडी ही आम्हाला पश्चिम महाराष्ट्रात करायची आहेत व त्यात पहिले खेडे कुंभोज घ्यावे, असा आम्ही विचार करतोय आणि बाकीची दहा खेडी आम्हाला सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या भागात करायची आहेत. पुढच्या दहा वर्षात ही खेडी तयार होतील व त्याचा परिणाम इतर खेड्यांवरही व्हायला हवा.

मित्रांनो, आम्ही व्यावसायात आहोत. पण, मातीशी बांधिलकी ही महत्त्वाची गोष्ट जैन इरिगेशनने नेहमीच ठेवली आहे. सामाजिक बांधिलकी ठेवून आम्ही शिक्षणामध्ये काम करतोय. जसे आम्ही येथे येऊन शेती हा विषय घेऊन रयत शिक्षण संस्थेबरोबर काम करतोय, तसे आम्ही शिक्षण हा विषय घेऊन जळगावला काम करणार आहोत. रयत शिक्षण संस्थेने आम्हाला तेथे मदत करावी. कारण, त्यांचे एवढे काम आहे, आज आपण वाचले असेल, थोडा वादाचा विषय आहे, भारत सरकार हे 'इन्स्टिट्यूट ऑफ इमिनन्स' सरकारी विद्यापीठांना देणार आहे, असे आले होते. ज्या इन्स्टिट्यूटचा अजून जन्मही झाला नाही, अशांनाही देणार असे म्हटले होते. पण, जर असे काही सर्टिफिकेट द्यायचे असेल मान्यता द्यायची असेल तर, जागतिक स्तरावर रयत शिक्षण संस्थेला मिळेल. कारण, इथे जे काम होतेय, येथे जे साडे चार लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ज्या समर्पण भावनेने काम होतेय, हे असे काम जगात फारच कमी ठिकाणी पाहायला मिळते आणि ज्या निष्ठेने डॉ. अनिल पाटील, इथले प्राध्यापक, कर्मचारी वर्ग, रयत शिक्षण संस्था काम करीत आहे, हे काम आणि आम्ही १२० देशांत आमची कंपनी काम करतेय, म्हणून मी म्हणू शकतो की, आपण जग बघितले आहे. पण, हे जे काम होतेय, त्याची तुलना कोठेच होऊ शकत नाही.



जैन इरिगेशन व मला येथे बोलावल्याबद्दल पुन्हा एकदा मी डॉ. अनिल पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानतो, सत्काराच्या पात्रतेचा मी नाही. पण, जे काम माझ्या वडिलांनी सुरू केले आहे, तेच आम्ही पुढे करीत आहोत. त्याच्यात आपला नेहमीच सहयोग राहावा ही अपेक्षा करतो.